REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# " संत एकनाथ आणि मराठी साहित्य "

**प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे**
**(एम.ए., एम.फिल, बी.एड, पी.एचडी)**
**मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**

**प्रास्ताविक :**

१५ व्या शतकात भागवत धर्माचा पाया संत एकनाथ महाराजांनी घातला. महाराष्ट्रामध्ये धर्म, मंदीर सुरक्षित ठेवण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. महाराष्ट्रामध्ये मुस्लीम सत्ता होती तसेच वातावरण अस्थिर होते, त्यामुळे मराठी समाजाचे सांस्कृतिक खच्चीकरण झाले. अशा अवस्थेत संत एकनाथांनी या परिस्थितीला सावरण्याचे कार्य केले आहे.

एकानाथ मुळ पैठणचे, बालपणीच वडील स्वर्गवासी झाले. नाथांची पत्नी गिरिजाबाई व पुत्र हरिपंत. नाथांचे गुरु जर्नादन स्वामी यांच्याकडून आध्यात्मज्ञान घेतले. त्यांच्या जीवनातील सर्व महत्वाच्या घटना हया नाथषष्ठीला घडल्या म्हणून नाथ षेष्ठीला महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. जन्म निर्माण, गुरुउपदेश, ज्ञानेश्वरी, संशोधन इत्यादी गोष्टी हया नाथषेष्ठीलाच घडल्या. नाथाचे वंशज -भानूदास चक्रपाणी , सूर्यनारायण - भानूदास चक्रपाणी हे नाथांचे पणजोबा, त्यांनी महाराष्ट्रामध्ये विठ्ठलभक्ती आणली. नाथ हे दत्तसंप्रदायी आहे. परंतु विठ्ठलभक्ती महाराष्ट्रात आणली म्हणून त्यांना वारकरी म्हणतात. नाथांनी अनेक ग्रंथाची रचना केली . चतु:श्लोकी भागवत, भावार्थ रामायण, रुख्मिणी स्वयंवर, स्फुटकाव्य, चरित्रग्रंथ व भारुड, अभंग रचना लिहिल्या.

**चतु:श्लोकी भागवत :**

ही रचना त्यांनी गुरुच्या आज्ञेवरुन केली आहे. एकनाथांनी मूळ भागवतग्रंथाच्या चतु:श्लोकी भागवतवार मराठीतून ओवीबध्द भाष्य केले आहे. ईश्वर, जीव, माया, ब्रम्ह यासंदर्भात विवेचन केले असून तत्वज्ञानात्मक सिध्दांतावर भाष्य केले आहे.

**एकनाथी भागवत :**

नाथाचा हा ग्रंथ लोकप्रिय आहे. श्रीमद भागवत या संस्कृत ग्रंथातील ११ व्य स्कंधावर ओवीबध्द मराठी भाषेत भाष्य करुन नाथांनी ज्ञानेश्वरांची भाष्यपरंपरा चालू ठेवली. या ग्रंथात त्यांनी अनेक दृष्टीतून संसारी मानसाचे प्रबोधन केले आहे. कबूतर आणि कबुतरी या पक्षाच्या दृष्टांतून संसारग्रस्त माणसांचे चित्र नाथांनी उभे केले आहे.

" ज्ञानी निवती परमार्थ बोधे | पंडीत निवली पदबंधे |
सामान्य निवती कथा विनोदे | ग्रंथ संबंधे जग निवे || "

नाथांनी सर्व प्रकारच्या श्रोत्यांसाठी काव्य लेखन केले आहे. समाजाला योग्य वळण लागावे ही नाथांची तळमळ होती. स्त्री-पुरुषांना शुध्द आचारण, नैतिकता योग्य विचार देणारे एकनाथांचे साहित्य ठरते.



**रुख्मिणी स्वयंवर :**

नाथांनी हे काव्य काशीयात्रेच्या काळात मनकर्णिका घाटावर लिहिला आहे. नरेंद्र भास्कर यांनी आख्यान काव्याची परंपरा चालू केली आहे. रुख्मिणीस्वयंवर हे आख्यान काव्य आहे. ही आख्यानकाव्याची परंपरा नाथांनी पुढे चालू ठेवली आहे. या काव्यात रुपक शैलीचा वापर करुन नाथांना कृष्ण-रुख्मीणीच्या विवाह प्रसंगाची कथा सांगितली आहे. कृष्ण, रुख्मिणी , भीमक, शिशूपाल, बलराम, सुदेव, रेवती यांचे व्यक्तिचित्रण केले असून आध्यात्मिक ज्ञानाला महत्व दिले आहे.

" प्रतिपदी प्रतिपदावे परब्रम्ह | हाची कवित्वाचा धर्म || "

नाथांनी काव्यातून रुपकाचा वापर करुन समाज जागृती करण्याचे कार्य केले आहे. या रुपकातून तत्कालीन परिस्थितीचे चित्रण आलेले आहे.

धेंडानृत्य, आंबा, शिंपणी इत्यादी मधून तत्कालीन लोकरीती दिसतात. विविध पदार्थ, खाद्यपदार्थ, वस्त्र, वस्तू यातून जीवनातील, लोकव्यवहारातील सांस्कृतीक, सामाजिक बाबीचे दर्शन घडते. भाषेच्या दृष्टीने या काव्यामध्ये अलंकार, प्रसंगवर्णन यामूळे हे काव्य लोकप्रिय ठरले आहे. शके १५८३ मध्ये एकनाथ आळंदीला गेले. तेथे ज्ञानेश्वरांच्या समाधीचा शोध घेतला आणि ज्ञानेश्वरीचे संशोधन केले. संत एकनाथ हे पहिले ज्ञानेश्वरीचे संशोधक ठरतात.

" या ज्ञानदेवी पाठी | जो आळी करील मराठी |
त्याने आमृताचे वाटी | जाण नरोटी ठेविली ||"

**भावार्थ रामायण :**

ज्ञानेश्वरांनी 'भावार्थ दीपिका' लिहिला तर एकनाथांनी 'भावार्थ रामायण' हा ग्रंथ लिहिला. ज्ञानदेवांची 'भावार्थ' सांगण्याची भूमिका जाणीवपूर्वक आत्मसात केली आहे. त्यानी 'राम' हा आदर्श म्हणून समोर ठेवला. या 'रामायण' ग्रंथात त्यांनी राम, रावण, लक्ष्मण, सिता, हनुमाण यांचे व्यक्ति चित्रण केले आहे.

राम हा भारतीय संस्कृतीचा आदर्श आहे. आदर्श पती, आदर्श पुत्र, आदर्श राजा, आदर्श पिता, आदर्श बंधु, आदर्श मित्र इ. विविध प्रकारे रामाचा आदर्श नाथांना समाजमनावर बिंबवायाचा होता. हे कार्य भावार्थ रामायणाच्या माध्यमातून केले.

एकनाथांनी प्रल्हाद चरित्र, ध्रुवचचित्र, हस्ता मलचरित्र इ. लहान आख्याने इ. चरित्रे लेखन केले. मराठी साहित्यातील महत्वाचे योगदान म्हणजे भारुडरचना या भारुड रचनेतून समाजप्रबोधनाचे कार्य केले.

**भारुड :**

'भारुड' हा काव्यप्रकार सर्वप्रथम ज्ञानेश्वरांनी लिहिला परंतु अल्पप्रमाणात लिहिला. नाथांनी मात्र समाजमनातील कृती-उक्ती, विकृती, स्वभाव यांचा सूक्ष्म अभ्यास करुन लोकभाषेचा उपयोग करुन नाटयमय रचना केली आहे. भारुडा मध्ये रुपक शैलीचा वापर केला असून या भारुडातून आध्यात्मिक ज्ञान समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य भारुडाच्या माध्यमातून केले आहे. लोकभाषा, लोकरीती, लोकजीवनातील प्रसंग यांचा उपयोग करुन, सौदी, डवरी, महारीण, विंचू, वेसवा इत्यादी भारुडे प्रसिध्द आहे.

अभ्यासकांनी भारुड शब्दाची व्याख्या वेगवेगळया सांगितल्या आहे. 'बहुरूढ' पासून भारुड शब्द तयार झाला. भा+रुढ = प्रतिभायुक्त रचना असे काही अभ्यासकाचे मत आहे. भारुड एक नाटय रचना आहे. या रचनेतून संसाराविषयी असमाधान प्रकट करणाऱ्या स्त्रीचे वर्णन करतात.

"मोडकेसे घर | तुटकेसे छप्पर |
देवाला देवघर नाही | मला दादला नग गं बाई ||"

'एकलेच राहू दे मला' म्हणते, विंचू चावला. या सारख्या भारुडातून अध्यात्म सांगून विषयाचे विडंबनातून समाजाचे परिवर्तन घडून आणले.

" संसार करिता शिणले बहू |
दादल्या विकून आणले गहू ||"

अशा रुपकात्मक रचनेतून जन-माणसाला आनंद मिळतो. आज ही जन-माणसात भारुड हे काव्य लोकप्रिय आहे. चटकन पकड घेणारी भाषा आविर्भावयुक्त रचना, अभिनयानुकूल मांडणी, लोकधारणी-लोकभाषेचा स्विकार, लोकस्वभावाचे पैलू त्यातून प्रकट होतात.

**गौळण :**

" वारियाने कुंडल हाले | डोळे मोडित राधा चाले |
राधा पाहूनि भुलले हरि | बैल दुभती नंदा घरी ||"

या सारख्या गैळणी एकनाथांनी लिहिल्या. आजही खेडयाखेडयात नाथांच्या गौळणी प्रसिध्द आहे. या गौळणी मध्ये नादयमय, तालबध्द, गायनानुकूल रचना लोकप्रिय ठरल्या आहे.

**हिंदू कर्कसंवाद- अर्जदास्त :**

नाथांनी 'अर्जदास्त' गद्य प्रकरण लिहिले आहे. नाथांनी हिंदू-तुर्क संवाद आणि अर्जदास्त लिहून एक नवा आकृतीबंध मराठी वाङ्मय आणला. त्या काळात हिंदू - मुस्लिम मध्ये संघर्ष होत. नाथांनी त्यांचे चित्रण केले आहे. हिंदू-कर्क संवादात एक ब्राम्हण व मुस्लिम परस्परात भांडत आहेत असे संवादनाटय उभे करुन त्याचा शेवट करतात.

" कुरुक कहे वो बात सही |
खुदा कूतो जात नाही ||"

अर्जदास्त प्रकरणात त्या काळातील कुलकर्णी, पाटील जनसामान्यांना कसे त्रास देतात त्यांची तक्रार ईश्वराकडे केली आहे. त्या काळातील सरंमजाम व्यवस्था व त्यातील शोषण त्यांनी त्यातून मांडले आहे.

नाथांनी विविध प्रकारचे साहित्य लेखन करुन अध्यात्माला महत्व देऊन समाज प्रबोधन करण्याचे कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ :**

१. मध्ययुगीन मराठी . वाङ्मयाचा इतिहास - डॉ. विद्यासागर पाटणकर.
२. संत एकनाथांच्या स्फुटलखनाचा विविचक अभ्यास - डॉ. कुमुद गोसावी.
३. संत एकनाथ : . वाङ्मय आणि कार्य -



**प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे**
**(एम.ए., एम.फिल, बी.एड, पी.एचडी)**
**मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**